# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

भाग – ३

# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांची

प्रवचने

भाग - ३

मधुकर थोंड दळवी

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
दत्तजयंती (दत्त पौर्णिमा), शके १९२९
रविवार, दि. २३ डिसेंबर, २००७

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प.पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

॥ श्री गुरु:शरणम् ॥

# अर्थ शुद्धी

*आपदांपहर्तारं दातारं सर्व संपदाम् ।*
*लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥*

शुचिता, पावित्र्य ज्याला म्हणतात, हा एक मोठा गुण आहे आणि तो फक्त शास्त्रगम्यच आहे. ***इंद्रियांनी, पवित्रता ही कांही दिसू शकत नाही. स्वच्छता दिसू शकेल. साबण लावून कपडे स्वच्छ दिसतात असे आपण म्हणतो. स्वच्छता निराळी आणि शुचिता, पवित्रता ही निराळी आहे. हा एक महत्वाचा गुण आहे. शुचितेचं पर्यवसान अगदी पूर्ण शुचिता.*** सर्व दृष्टीने पवित्र, ब्रह्मरुप झालेला असतो तो महात्मा. आणि ब्रह्म हेच फक्त शुद्ध आहे. बाकी सगळंही अशुद्ध आहे. त्याच्याकरता शुचिता समजावी. मनाला संवय नाहीये ती. शास्त्र, संस्कृत बुद्धीला, मनाला समजणारी शुचिता आहे ती.

शब्दांची शुद्धी ही व्याकरण शास्त्राचा अभ्यास करणारे आणि त्याच्यामध्ये ज्यांना आणखी पुष्कळ प्रवेश झालेला आहे, चांगले अशा प्रकारचे शास्त्रज्ञ महात्मे हे शब्दांची शुद्धी अशुद्धी हे नुसते ऐकून जाणू शकतात. मनाची शुद्धी आहे. शरीराची शुद्धी आहे, वाणीची, शुद्धी आहे. चारही पुरुषार्थांची शुद्धी आहे. धर्माची शुद्धी आहे. ***भगवंतांनी उद्धवजींना उपदेश करीत असताना कोणचं कर्म शुद्ध आहे, कोणचा धर्म शुद्ध आहे तर, मला अर्पण केले गेलेले जे कर्म आहे ते शुद्ध आहे, असे सांगितले आहे. द्वंद्वातीत होतं ना ते कर्म ! पाप, पुण्य हा भेदच त्यातला नाहीसा होतो. ईश्वरार्पण बुद्धीनं जी***

***कर्म होतात, जो धर्म होतो, आचरण ज्याचं होतं, ते अत्यंत शुद्ध कर्म. याचा अर्थ त्यातलं द्वंद्व गेलेले आहे. चांगलं वाईट असं कांही त्याच्यामध्ये नाही.***

अर्थामध्ये शुद्धी. अर्थ हे साधन आहे. अर्थ, काम हे दोन पुरुषार्थ आहेत. ते साधनभूत मानलेले आहेत आणि याच्यावरच सर्वही व्यवहार अवलंबून आहे. व्यावहारिक जी कांही सुखं वगैरे असतील त्या सुखांचं साधन म्हणून अर्थ, काम यांचा स्वीकार धर्मशास्त्रकारांनी केलेला आहे. कामाची शुद्धी आहे, अर्थाची शुद्धी आहे. आणि शेवटचा पुरुषार्थ म्हणजे फलभूत आहे. मोक्ष! सर्वही दु:खाची आत्यंतिक निवृत्ती. पुन्हा दु:खं कधीही उत्पन्न न होणं.पूर्ण निवृत्ती दु:खाची यालाच मोक्ष असे म्हणतात. ती सर्वांनाच पाहिजे आहे. मोक्ष कोणाला नको असे नाही. दु:खनिवृत्ती सर्वांनाच ईष्ट आहे. तर हे चार पुरुषार्थ आहेत. एक फलभूत आहे आणि बाकीचे साधनभूत आहेत. धर्म, अर्थ आणि काम या तिघांनी त्यांची शुचिता, शुद्धी वगैरे करुन त्याच्याकरता आचार कसा असावा हेही समजून घ्यावा हे शिकवावं म्हणतात. लहानपणापासून शिकवायचं आहे.

उपनयन झाल्याबरोबर अध्ययन संस्काराला सुरवात होते. बुद्धीवर संस्कार करायचे आहेत. आचार्यमहाराज संस्कार शब्दाची व्याख्या करतात - 'बुद्धीमध्ये असणारे दोष दूर करणं आणखी त्या बुद्धीमध्ये गुणधान करणं'. शुचिता हा मोठा गुण आहे. फार महत्वाचा गुण आहे. बुद्धीमध्ये शुचिता निर्माण होणं आणि ती शुचिता बुद्धीमध्ये निर्माण झाल्याबरोबर मग वाणी म्हणा किंवा बाकीच्या इंद्रियांमध्ये

वगैरे उत्पन्न होऊ शकते. त्याच्याकरताही आचार वेगळे वेगळे सांगितले आहेत. तर आचाराचेही शिक्षण द्यावे. आणि शुचिता, पवित्रता काय आहे ते त्याला शिकवावं लागतं. शास्त्रीय विषय आहे. परंतु शास्त्रज्ञ जे महात्मे आहेत, वसिष्ठादिकांसारखे, पराशर आहेत, याज्ञवल्क्य आहे, अत्री महर्षी आहेत, सर्वही वेदांचा अभ्यास ह्यांचा झालेला आहे. ह्यांचं मन, बुद्धी अत्यंत शुध्द आहे. पवित्र झालेलं आहे. त्यामुळे मनामध्ये ही शक्ती निर्माण झालेली आहे. त्यांच्या बुद्धीमध्ये ही एक शक्ती निर्माण झालेली आहे. शास्त्राचं एकंदर तात्पर्य, वर्म काय आहे, रहस्य काय आहे हे त्यांच्या मनाला, बुद्धीला समजावून आलेलं आहे. आणि तेच त्यांनी स्मृतीरुपाने आपल्या पुढे मांडले आहे.

शुचिता आणि आचार या दोघांचेही शिक्षण गुरुगृहामध्ये राहून ब्रह्मचाऱ्याने घ्यायचे आहे. ***''शिक्षा'' शब्दाचा अर्थ शास्त्रकारांनी ''शिष्याला बरोबर ज्ञान व्हावे या करता केला जाणारा व्यापार'' असा केला आहे. वाणीचा असेल, मनाचा असेल. कोणचाही व्यापार होऊ शकेल.*** तर तेही महात्मे आहेत. शास्त्रज्ञान संपादन केलं आहे त्यांनी. ज्ञानधन त्यांना म्हणतात ना ! तपोधन किंवा ज्ञानधन. तपोधन आहेत म्हणून तर ज्ञानधन ते होऊ शकतात. त्यांनी आपलं सगळं आयुष्य ज्ञानाकरताच खर्च कलेले आहे. ठरविलेले आहे - ज्ञान मिळवायचं. तर ते मिळालेले ज्ञान, दोषांचेही ज्ञान आहे आणि गुणांचेही ज्ञान आहे.

***जेमिनी महर्षींनी ''धर्ममीमांसा''***नांवाचे शास्त्र केले. ते सूत्र-कार आहेत. त्यात अधर्माचाही विचार केला आहे. 'अथा तो

धर्मजिज्ञासा'. अथा तो अधर्मजिज्ञासाही त्यात अंतर्भूत आहे. अधर्माचा विचार हा त्यागाकरता आणि धर्माचा विचार हा ग्रहण करण्याकरता आहे. त्याप्रमाणे वागण्याकरता आहे. विचार करुन हे ज्ञान मिळिवलेलं आहे. ते ज्ञान दृढ होतं. आणि दृढ ज्ञान झाल्यानंतर मग आचरणाकडे प्रवृत्ती होते. आचरणाकडे प्रवृत्ती होण्याकरता बुद्धीमधले दोष सगळे दूर व्हायला पाहिजेत. आणि शुचित्वासारखे जे गुण आहेत त्या गुणांचे आधान त्या बुद्धीमध्ये झालं पाहिजे. आता हे दोष सगळे समजायचे त्याकरता शिक्षण घ्यावं लागतं आपल्याला. तर ही जी शुचिता, पवित्रता ज्याला म्हणतात तो एक शास्त्रगम्य पदार्थ आहे. कोणचं पवित्र आणि कोणचं अपवित्र आहे फक्त त्यांनी दाखिवलेलं आहे.

लोकसंग्रह शब्दार्थ जो केलेला आहे.

***'उन्मार्ग प्रवृत्ती निवारणम्'***

उन्मार्गाकडे जी प्रवृत्ती होत असती आपल्या बुद्धीची म्हणता इंद्रियांची वगैरे, त्या प्रवृत्तीचं निवारण करणं आणि सन्मार्गाकडे प्रवृत्ती व्हावी अशी योग्यता संपादन करणं म्हणचे दोष निवृत्ती हाच त्यांचा अभिप्राय आहे. आणि त्याच्याकरता ज्ञानी पुरुषांनी ते स्वत: कर्माचरण करावं, आचार करुन दाखवावा असही त्यांना सांगितलेलं आहे.

अर्जुनाला तर तोच उपदेश आहे. मी स्वत: करतो, म्हणाले, लोकांना मार्गदर्शन व्हावं म्हणून, धर्माचरण करतो आणि तूं तर धर्म टाकायला लागलास ! लोकांच्या पुढे असाच आदर्श ठेवणार आहेस का तूं ? धर्माचरण तुला अवश्य केलं पाहिजे. त्यांत हा एक आहे -

- लोक संग्रह झाला पाहिजे. लोकांची उन्मार्गापासून निवृत्ती झाली पाहिजे. पवित्र कळलं पाहिजे म्हणजे अपवित्र ह्याचा त्याग करता येईल. त्या पावित्र्याचे महत्व काय आहे हे अगोदर समजलं पाहिजे. मनाचे पावित्र्य मुख्य सांगितलं आहे. पण मानसिक पवित्रता, शुचिता ही निर्माण होण्याकरता त्या शरीर, वाणीच्या पवित्रतेची जरुरी आहे. बाह्य साधनं जेवढी आहेत त्यांच्यामध्ये सुध्दा शुचिता असली पाहिजे.

कालाची शुचिता, त्यांनी धर्म अविरुध्द त्या ठिकाणी शुचिता आहे. तो भगवंताची विभूती आहे, असच भगवान सांगताहेत. त्याचप्रमाणे अर्थ हेही साधन आहे. अर्थाचीही शुचिता आहे. गृहस्थाश्रमी पुरुषाला उपदेश करताना स्मृतीकार म्हणतात - त्यात त्यांनी गृहस्थाश्रमी पुरुषाला ''न्यायार्जित धन'' हे घातलेलं आहे.

***'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे'***

तुकाराम महाराजही सांगतात. ***उत्तम व्यवहार करुन धन जोडावं. अर्थकामाचा त्याग करावा असं सांगत नाहीयेत.*** ब्रह्मचर्याश्रम आहे, गृहास्थाश्रम आहे, वानप्रस्थाश्रम, संन्यास हे आता कमी झालेले आहेत. गृहस्थाश्रमामध्ये अशा प्रकारचे अधिकारी महात्मे, वानप्रस्थाश्रमी, संन्यासी दिसत नाहीत आपणाला. आदर्शच समोर राहिला नाही मग ती शुचिता समजून कशी घ्यायची ?

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांना साठ सत्तर वर्षांचा काळ होऊन गेलेला आहे --

***'तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते'***

या शिवाय अन्यत्र प्रवृत्ती त्यांची कधीही झाली नाही. संन्यास

घेतल्यानंतर भिक्षेला निघाले म्हणजे मंडळी त्यांच्या पुढे जात होती ''अहो, या वेळेला नमस्कार करायचा नसतो, करु नका'' भिक्षेला निघाल्यानंतर स्वामींना नमस्कार केला म्हणजे त्या दिवशी उपोषण. हे जे सगळं शास्त्रप्रमाण सांगितलं आहे, योग्या-योग्य, पवित्र भिक्षा कोणची, अपवित्र कोणची आहे, त्याज्य आहे हे सगळी शास्त्राने सांगितलेलं त्यांनी समजून घेतलेलं आहे. आणि त्याप्रमाणे आचरण केलं न त्यांनी !

***'आचार: प्रथमो धर्म:'***

म्हणतात. किंवा ***'आचार: प्रभवो धर्म'*** म्हणतात.

आचार, शिष्टाचार हे प्रमाण आहे धर्मज्ञानाचे. श्रृती स्मृती वगैरेही प्रमाणे आहेत. ती शब्दरुप आहेत. पण ही जी शिष्टांची क्रिया आहे, याचना आहे, हीसुध्दा एक प्रमाण आहे. शब्दांचे प्रमाण होऊ शकते. प्रमाणांमध्ये शब्दांचा अंतर्भाव आहे. आचाराचा, क्रियेचा प्रमाणामध्ये अंतर्भाव नाहीये. म्हणून विचारांनी ज्ञान होत नाही म्हणतात. विचार म्हणजे कांही प्रमाण नाहीये ना ! मानसिक योग्यायोग्य विचारांचा प्रकार मीमांसाकारांनी दिला आहे.

विचार म्हणजे मनाने विचार केला जातो. साधक बाधक दृष्टीने, युक्तीने विचार केला जातो. तर युक्तीने विचार करणं प्रमाणामध्ये येऊ शकत नाही. प्रमाण नाही ते. ज्ञानाचं साधन नाहीये. म्हणून विचारांनी ज्ञान होत नाही असे ते म्हणतात. ***विचारांनी मनामध्ये असणारे दोष दूर करता येतात. आणि निर्दोष मन झाल्यानंतर श्रृती स्मृती वगैरे हे जे शब्द आहेत, हे शब्द ऐकल्यानंतर आपल्याला लगेच ज्ञान होते. ते ज्ञान व्यवस्थित होऊ शकतं.***

तो पर्यंत होऊ शकत नाही. म्हणून विचारांनी सगळे दोष दूर करण्याकरता विचार चिकित्सा शास्त्रकारांनी सांगितलेली आहे. श्रवण करायचं, मनन करायचं. ज्ञानाच्या त्या भूमिका आहेत. श्रवण म्हणजे ज्ञान आहे. मनन म्हणजेही ज्ञान आहे. तात्पर्य, ज्ञान. – एकंदर ग्रंथाचं तात्पर्य काय आहे हे समजून घेणं ही एक पहिली भूमिका आहे. ऐकल्यानंतर जे आहे ते योग्य आहे की अयोग्य आहे हे समजून घेण्याकरता दुसरी ज्ञान भूमिका म्हणजे मनन आहे. मननाला चिकित्सा असे म्हणतात.

अशा प्रकारचे ज्ञानसंपन्न जे मोठे महात्मे आहेत त्यांच्याजवळ मनन करायचे आहे. आपल्या मनांत जे कांही संशय, संदेह वगैरे आले असतील ते सांगायचे. आणि ते सगळे संदेह दूर करुन त्यांच्याकडून ज्ञान करुन घ्यायचे आहेत. कोणचा संशय उत्पन्न झालेला आहे, तो संशय दूर करण्याकरता गुरुमहाराजांनी काय विचार मांडले आहेत, त्या विचारांनी आपली संशय निवृत्ती कशी झाली हे सगळं शिकायचं आहे. ह्या सगळ्या ज्ञानाच्याच भूमिका आहेत. म्हणून चिकित्सासुध्दा ज्ञानाला परंपरेनं 'साधन' अशा प्रकारची आहे. बुद्धीतले संदेहादिक दोष दूर होतात. अश्रद्धा दोष आहे, अज्ञान दोष आहे. चांगल्या पुरुषांजवळ राहून जर विचार झाला तर त्याने बुद्धीतले दोष दूर होतात. निर्दोष झालेल्या बुद्धीमध्ये उत्पन्न झालेले जे ज्ञान आहे ते स्थिर होऊ शकतं. ते ज्ञान शब्दप्रमाणाने होतं.

शुचिता हा महत्वाचा गुण आहे. गीतेच्या १६ व्या अध्यायात सांगितले आहे –

***अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थिति: ।***
***दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥***
***अहिंसा सत्यमक्रोधस्त्याग: शान्तिरपैशुनम् ।***
***दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ऱ्हीरचापलम् ॥***
***तेज: क्षमा धृति: शौचमद्रोहो नातिमानिता ।***
***भवन्ति संपदं दैवीमभितातस्य भारत ॥***

हे २६ गुण सांगितले आहेत. हे सगळे गुण म्हणजे बुद्धीमध्ये उत्पन्न झालेल्या शुचितेचा विकास आहे. इतकी बुद्धी पवित्र झालेली आहे की त्या बुद्धीमध्ये गुण आपोआप निर्माण होतात. ह्याला ज्ञान म्हणतात भगवान. ज्ञानाची ही साधने आहेत वास्तविक. पण साधने जरी असली तरी व्यक्त रुपाने ते ज्ञानच आहे म्हणतात. ज्ञान कांही बाहेर दाखिवता येत नाही. पहाता येण्यासारखे नाही. बुद्धीला समजण्यासारखे आहे. बुद्धीची एक वृत्ती हे सांगितले आहे. तर त्याचा विकास म्हणून मनाची इतकी शुचिता, पवित्रता झाली आहे की त्या पवित्र मनामध्ये हे सगळे गुण उत्पन्न होताहेत. हा शुचितेचा विकास आहे. पर्यवसान आहे.

***तर ही बुद्धी शुद्धी होण्याकरता आचाराची जरुरी आहे.*** त्याचेही शिक्षण द्यावे असे आणखी स्मृतीकार सांगतात. स्वत: ते आचरण त्याप्रमाणे करत असले पाहिजेत. ते नि:संदिग्ध पाहिजे. त्यांना शास्त्राचे उत्तम ज्ञान पाहिजे. त्याप्रमाणे ते आचरण करणार. ते ज्ञान उत्पन्न होण्याकरता त्यांची बुद्धी अत्यंत शुद्ध झाली असली पाहिजे. त्याकरता त्यांनीही सर्व एकंदर शास्त्राचा उहापोह, विचार केला असला पाहिजे. विचारांनी बुद्धी शुद्ध करुन श्रृतीस्मृतीचे ज्ञान

ज्यानी दृढ संपादन केलं आहे त्यांचे जे आचरण आहे त्याप्रमाणे आपण आचरण करुन इतरांना त्यांनी शिकवावं असं सांगितलं आहे. आणि त्या आचरणावरुनच प्रत्येक ठिकाणी असणारी शास्त्रगम्य शुचिता तिचं ज्ञान जो खरा जिज्ञासू आहे, श्रध्दाळू आहे त्याला होऊ शकतं. आणि ते शुद्ध ज्ञान त्याला मिळाल्यानंतर त्याचेही तसे आचरण चालू राहाते. आणि अशा आचरणामुळे शास्त्रप्रमाणाने मिळालेले ज्ञान आणि त्या ज्ञानाप्रमाणे होणारे आचरण, ह्या आचरणामुळे सगळी फलसिध्दी पुढे होती आहे. शरीर, मन, इंद्रिय, वाणी ह्या सगळ्यांच्याकडून जो आचार होणार आहे तो आचार असा अत्यंत पवित्र असला पाहिजे. पावित्र्य पोषक असला पाहिजे. पावित्र्य संवर्धक असला पाहिजे. त्याच्यामध्ये कोणतेही दोष येऊ नयेत म्हणून अशा योग्य पुरुषाकडून हे सगळं समजून घेतलं पाहिजे.

पहिला दोष अज्ञान म्हणून सांगितला आहे त्यांनी.

*'अज्ञश्च .............. संशयात्मा विनश्यति ।'*

हे क्रमाने सगळे दोष दाखिवले आहेत. ***तर आपल्याजवळ ज्ञानच नाही ना ! शास्त्रीय विषय काय आहे, त्याचे ज्ञान नसल्यामुळे आणखी कांही तरी ऐकून आपल्या मनामध्ये अनुकूल विचार उत्पन्न होतात, श्रद्धा कांही उत्पन्न होत नाही. अश्रद्धा असतीच मूळात. त्यामुळे मूळ दोष जो आहे अज्ञान हा दोष दूर करण्याकरता व्यवस्थित ज्ञान मिळालं पाहिजे. दोषांचेही ज्ञान पाहिजे, गुणांचेही ज्ञान पाहिजे. आणखी त्याच्या जोडीला अश्रद्धाही कमी झाली पाहिजे. जिज्ञासा जर असेल आणि ज्ञानाची तळमळ जर लागलेली असेल तर अश्रद्धा त्या ठिकाणी***

*प्रतिबंध करु शकत नाही. कारण आपल्याला ज्ञान मिळवायचे आहे. आणि अशा प्रकारचे महात्मे ज्ञान देण्याकरता आणखी समर्थ आहेत. ते ज्ञानाचा उपदेश आपल्याला करणार आहेत. आचरणाने उपदेश करताहेत, शब्दांनी उपदेश करताहेत, कोणीकडून आमची बुद्धी चांगली बनावी. ह्याच्याकरता हा विधी आहे. शुचितेचा उपदेश आणि आचाराचा समन्वय. तर हे जे सगळे उपदेश करायला सांगितले आहेत, ज्ञानमार्ग सर्व लोकांना त्यांच्याकडून आचरण व्हावं. ते आचरण त्यांच्या उन्नतीला क्रमाक्रमाने साधन अशा प्रकारचे होणार आहे. म्हणून*

*'सर्वेपि सुखिन: सन्तु'*

हा मूळ उद्देश आहे. महात्म्यांचे मन तर इतकं पवित्र झालेलं असतं, साम्यवाद कसा असावा, समता म्हणजे काय हे त्यांच्याकडून शिकावं. प्रत्यक्ष वसिष्ठ, वामदेवांसारख्यांची संगती आम्हाला होणं कठीण आहे आणि झाली तरी आम्हाला उपयोग होईल की नाही कुणाला ठाऊक. प्रत्येक वेळेला जर आम्ही संशय घ्यायला लागलो, अश्रद्धा व्यक्त करायला लागलो.

*त्यांनी आधीच सांगितले आहे – कोणी विचारायला आल्याशिवाय त्याला कांहीही सांगायचे नाही. ज्ञानाच्या कामात उपकार वगैरे नाहीये. ज्ञानाचा विस्तार करणं हेही कठीण आहे, शक्य नाहीये. ग्राहकाची योग्यता पाहून त्याला उपदेश करावा असे त्यांनी सांगितले आहे. ही पहिली भूमिका आहे. तो विचारायला आलाय का? आपली परीक्षा पहायला आलाय का? परीक्षा देण्याकरता आपण ज्ञान मिळवलेलेच नाही. ज्ञानाचा*

***उपयोग स्वत:च्या आचरणाकरता आहे, उन्नतीकरता आहे. खरा जो जिज्ञासू असेल त्याच्या उन्नतीकरता आहे. नुसतं दाखवण्याकरता ज्ञान नाहीये.***

आचार्यांनी ज्ञानाची व्याख्या करताना सांगितलयं जे ज्ञान उत्पन्न झालं असता इंद्रियांची पूर्ण शांती होते, सगळी इंद्रिये शांत राहातात, मन शांत राहातयं. हे ज्ञानाचे महत्व आहे. मनाला शांत करण्याकरता आणखी किती प्रयत्न करावा लागतो ! तिथं बाह्य शक्तीचा, राजशासनाचा कांहीही उपयोग नाही.

***म्हणून चांगले विचार हे आपल्याला कोणी तरी शिकीवणारा भेटला पाहिजे. निदान त्यांनी जे ग्रंथ करुन ठेवलेले आहेत ते वाचण्याची आपली बुद्धी तरी चांगली असली पाहिजे. मिळालं पाहिजे आपल्याला ज्ञान. आणि त्या ज्ञानाच्या योगाने आपलं आचरणही चांगलं सुधारलं पाहिजे. क्रमाक्रमाने ती शुचिता आणखी मनामध्ये, इंद्रियांमध्ये व्यक्त झाली पाहिजे. अशी तळमळ जरी आपल्या मनामध्ये असली तरी ते ज्ञान आपल्याला मिळू शकते.***

दत्तात्रेयांनी २४ गुरु करुन दाखिवलेले आहेत. आपल्या मनानेच आपल्याला कोणता गुरु करायचाय हे समजून येऊ शकतं. हेय काय आहे आणि उपादेय काय आहे हे समजून घेण्याकरताच त्यांनी आपल्या बुद्धीने २४ गुरु निवडले आहेत. ते उत्तम अधिकाऱ्याचे लक्षण आहे. ज्यांची बुद्धी उत्तम, सुसंस्कृत झाली आहे. अशा प्रकारच्या महात्मांच्या जवळ राहून शुचिता आणि आचार ज्याने पाहिलेले आहेत ती शुचिता आपल्याला मिळावी, त्याची साधनं

कोणती आहेत, हे आचार अशा प्रकारचे कशाकरता करायचे हे सगळं त्यांनी समजून घेतलेले आहे आणि समजून घेऊन ती अश्रद्धा दूर झाली म्हणजे श्रद्धेने आचरण चालू आहे. अशा रीतीने चालू असताना तो आपल्या बुद्धीने हेयोपादेय विवेक करुन घेऊन शकतो. दत्तात्रेयांच्या २४ गुरुंमध्ये किती तरी वेगळे वेगळे दोष त्यागाकरता गुरु, गुण ग्रहणाकरता गुरु. नाथमहाराजांनी म्हटलयं, सगळं जगच गुरु आहे. दत्तात्रेयांनी या दृष्टीने जगालाच गुरु केले आहे. ***गुरु शोधण्याकरता, परीक्षा करण्याकरता आणखी जाण्याची जरुरी नाही. साधकाने आपली बुद्धी जर तयार केली त्या करता असा संतांचा सहवास झाला पाहिजे. तो होता होता एखाद्या जन्मामध्ये उत्तम बुद्धी जर त्याला मिळाली तर तो आपल्या स्वत:च्या बुद्धीने हेयोपादेय विवेकाचे ज्ञान संपादन करतो आणि काय घ्यावं आणि काय सोडावं हे त्याच्या बुद्धीला समजून येतं.***

***संग्रह योग्य आहे की अयोग्य आहे हा एक सध्या मोठा विचार आहे जगामध्ये. एकत्र व्यक्तीने जास्त संग्रह करु नये. अर्थ साम्य व्हावं असा एक विचार सध्या मांडला जातो. सर्वत्र अर्थाची समता झाली पाहिजे. आर्थिक विषमता उत्पन्न झाली म्हणजे समाजामध्ये संघर्ष उत्पन्न होतो. आणि संघर्ष निर्माण झाल्यानंतर मग शांती जाती. म्हणून अर्थ–साम्याचा एक विचार बऱ्याच राष्ट्रांमध्ये मांडला जातो आहे सध्या.***

***तर अर्थाची विषमताही पाहिजे, कमी जास्तीपणाही पाहिजे. त्या शिवाय आपल्याला आणखी प्रयत्न करता येणार नाही.***

***'साहसे श्री प्रति वसति'***

शास्त्रकार सांगतात. साहस जर असेल तर प्रवृत्त होतोय तो. आणि मिळतो पैसा. ***लॉटरीची तिकीटे घेणे हे साहस होणार नाही.*** एका कुठल्या तरी मासिकात एकाने एक लेख लिहिला होता. ''माझ्या आईने मला सांगितलयं, लॉटरीचे तिकीट तूं कधीही घेऊ नकोस. एक दोन रुपयाच्या तिकीटाला एक लाख रुपये मिळाले म्हणचे ज्यांचे पैसे बुडाले त्यांचे तळतळाट लागतील. या भानगडीत पडू नकोस. माझ्या आईची आज्ञा म्हणून मी लॉटरीचे तिकीट घेत नाही.'' नीतीच्या दृष्टीने हा एक विचार झाला.

***परंतु अर्थार्जन करायचे म्हणजे कांही तरी साधन पाहिजे. अर्थ शास्त्राने त्याला संमती दिलेली आहे. तर अर्थ संग्रह करायचा आहे. संग्रह हा दोष आहे का गुण आहे? हाही एक विचार आहे. नुसतं हा गुण आहे की दोष आहे कसं ठरविता येईल? संतोष हा गुण आहे की दोष? ह्याचं उत्तर काय आहे? त्यांनी दोन्ही उत्तरे दिली आहेत. संतोष हा गुणही आहे आणि दोषही आहे. पण त्याचे अधिकारी वेगळे वेगळे आहेत. विप्राने संतोषाने राहायला पाहिजे. असंतोष जर व्दिजांच्या अंत:करणात असेल तर त्यांची उन्नती होणार नाही. म्हणजे संतोष हा त्या विप्राचा गुण सांगितला. आणखी क्षत्रिय जर संतुष्ट राहायला लागला तर तो त्याचा दोष आहे.*** दुर्योधनाने राज्याचा लोभ धरला तरी राजनीतीच्या दृष्टीने त्याचा तो गुण आहे. सुईच्या टोकावर राहील एवढीसुद्धा जमीन युद्धाशिवाय मिळणार नाही. हे त्याने अगदी जोरात सांगितले. कृष्णाने सांगितले, ''विचार कर. अर्जुन केवढा मोठा योद्धा आहे ! भीष्म

द्रोणासहित तुम्हा सर्व कौरवांना नेण्याकरता विराटनगरामध्ये तो एकटा आला होता. आचार आणि पावित्र्य या दोघांमुळे शंकर, इंद्र, द्रोणाचार्यांसारख्या गुरुंपासून उत्तम अस्त्रज्ञान त्याने मिळिवलेले आहे. हे तूं अनुभवलेले आहेस. तेव्हां विचार करुन त्यांचे अर्धे राज्य दे'' दुर्योधनाने ते मानले नाही पण राजनीतीच्या दृष्टीने तो योग्य ठरलेला आहे. क्षत्रियाने संतुष्ट राहिले तर त्याचा नाश होतो. आपली जमीन शत्रूने घेतल्यावर ''घेतली तर घेतली'' असे म्हणून चालणार नाही. उद्या आणखी चांगली जमीन घेणार नाही कशावरुन ? इथे आपली राहिली तेवढी जमीन पुष्कळ आहे. असा संतोष मानून चालणार नाही. क्षत्रियांच्याकडे संतोष कधीही उपयोग नाही. ममता दोष असला तरी त्यांना ममता पाहिजे. माझी जमीन आहे एक तसुभरही मी घेऊ देणार नाही. ही वृत्ती म्हणजे संतोष हा त्यांना दोष सांगितलेला आहे. पण तोच संतोष ब्राह्मणाला गुण आहे. त्यांनी मात्र असंतोषाने राहू नये.

***पण अर्थ-शास्त्राच्या दृष्टीने असंतोष हा गुण आहे. शास्त्रकारांनी वैश्याचे वर्णन केलेले आहे. आता कांही ते वर्ण राहिलेले नाहीत. वैश्यांची वृत्ती कशी पाहिजे ? खरा व्यापारी कोण ? वैश्याचे गुण सांगताना कितीही पैसा मिळाला तरी ह्याच्या मनाला समाधान कधीही होत नाही. आणखी मिळवला पाहिजे असे वाटते, तो खरा व्यापारी आहे. मिळवायच्या वेळेला, मिळाल्यानंतर काय करायचे तो दुसरा गुण आहे. तर उत्तम व्यापाऱ्याने कधीही मनामध्ये संतोष मानून उपयोग नाही. इतका पैसा मिळाला पुरे झालं की आता. पुरे झालं म्हटल्यावर संग्रह***

***कसा होणार ? त्यांच्या प्रयत्नांनी संग्रह होतो आहे मग तो प्रयत्न एकट्याचा असो किंवा सामुदायिक असो, संग्रहाची राष्ट्राला जरुरी आहे. संग्रह नसेल तर चालणार कसं ? तर अर्थ संग्रह जो आहे तो कांही दोष म्हणता येणार नाही. अर्थ संग्रहाची आवश्यकता आहे. संग्रह करताना व्यापाऱ्याने असंतोष मानलाच पाहिजे. तो त्याचा गुण आहे. त्या शिवाय संग्रह होणार नाही. मिळवायची पद्धती कोणती हा विचार वेगळा. पण मनामध्ये असंतोष असल्याशिवाय जास्ती द्रव्यार्जन कसे करता येईल ?***

तर या करता दत्तात्रेयांनी दोन गुरु मुद्दाम सांगितले आहेत. संग्रह हा दोष नाही, म्हणाले. सूर्य नारायणाला एक गुरु केलेलं आहे. सूर्य नारायण आपल्या तेजाने सबंध पाणी शोषून घेतात. आणखी पावसाळ्यामध्ये ते मेघरुपाने देऊन टाकतो. हा एक संग्रह. गुण ग्रहण आहे.

दुसरे, एका पक्ष्याला त्यांनी गुरू केले आहे. एका पक्ष्याला एक मांसाचा गोळा सांपडला. तोंडात धरुन तो आकाशातून निघालेला असतांना ज्यांना मांस मिळाले नव्हते ते पांच पन्नास पक्षी त्याच्या अंगावर धावून आले. साम्यवाद ज्यामुळे उत्पन्न होणार नाही अशा गुणांची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. साम्यवादाचा प्रसार करण्याचा प्रयत्न करुन कांहीही उपयोग नाही. तो पक्षी एकटा आहे. ज्यांना मांस मिळालेले नाही त्याला काय करणार ? त्याने जेव्हां तो तोंडातला तुकडा टाकून दिला तेव्हा बाकीचे पक्षी निघून गेले. याचा त्रास वाचला.

तर संग्रह दोष आहे. संग्रह केल्यानंतर आपल्याला जी बुद्धी

होते ती बुद्धी दोषयुक्त आहे. भोगाकरता मी एकटा मिळिवणार आहे, एकट्याने मिळिवलेले आहे. अर्थात याचे स्वामित्व माझे एकट्याचे आहे. मीच याचा भोग घेणार. ही बुद्धी उत्पन्न झाली की साम्यवादाला बोलावणे आले. येणार. साम्यवाद येणार. तो आपोआपच येणार.

***म्हणजे भोगाकरता केला जाणारा संग्रह हा दोष आहे. संग्रहामुळे उत्पन्न झालेली जी भोगबुद्धी आहे तो दोष आहे. बुद्धीची शुचिता नाहीशी झाली की भोगाकडे लक्ष गेले. आणि त्यागाकरता जर संग्रह केला असेल तर दोष नाहीये.***

पुष्कळ पांच पन्नास वर्षापूर्वी बारशीला मोठी गिरणी होती. आता ती बंद झालेली आहे. तिथे साम्यवादी विचारसरणीचे जयप्रकाश नारायण एकदा आले होते. गिरणी मालकाने त्यांना १०,००० रु. दिले. तेव्हा जयप्रकाशजी म्हणाले, ''हे मालक राष्ट्रकार्याला मदत करतात. चांगलं आहे. मिळवावेत पैसे ह्यांनी.'' समाजवादी असूनही असे बोलले ते.

म्हणजे बुद्धीमध्ये तर आणखी दोष उत्पन्न झाला. मी एकट्याने मिळिवलेले आहे त्याचा भोग मी एकटा घेणार. त्याप्रमाणे तत्वज्ञान त्यांचे निर्माण झाले. सगळ्यांनीच मिळिवलेलं आहे, म्हणाले. मालक आणि मजूरांमध्ये फरक काय आहे? आमच्यासारखे हात पाय वगैरे त्याला आहेत. त्याचे भांडवल असेल पण आम्हीही दोन कामे करतो. मग त्याच्यामध्ये आणि आमच्यामध्ये काय अंतर आहे? त्याच्या उत्पन्नातला वाटा आम्हाला कां मिळू नये? ह्याच्या एकट्याचे हे द्रव्य कसं होतं, असं एक साम्यवादाला पोषक तत्वज्ञान निर्माण होतं मग. साम्यवादी लोक ते सांगू लागतात.


तर तात्पर्य असं आहे की ही बुद्धी आहे त्या बुद्धीमध्ये असणारी शुचिता नाहीशी झाली आहे. लोभ हा विकार उत्पन्न होतो. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सरामध्ये लोभ भयंकर मोठा दोष आहे. कारण काय आहे की आपल्याजवळ कांहीही पैसा नाही. अगदी दारिद्रय असतांना वाईट वाटतं. एक पैसासुध्दा माझ्याजवळ नाही. वस्त्र नाही. मिळायला लागला पैसा मग तरी समाधान व्हायला पाहिजे की नको? पैसा कांही नाही माझ्याजवळ, कांही भोग मला घेता येत नाही. अन्न वस्त्रसुद्धा नाही. योग्य आहे. वाईट वाटतं. पण द्रव्य मिळाल्यानंतर अशांती वाटण्याचं कारण काय आहे? लाभ जसा जसा व्हायला लागला तसा लोभ उत्पन्न व्हायला लागला. हे एवढच कां मिळाले मला? ह्याच्यापेक्षा अधिक मिळाले पाहिजे. मग उदाहरणे देतो. त्याने किती मिळीवले. मला इतकाच पगार. एकट्याला शक्य झालं नाही, चार लोक असे जमा करायचे. त्याप्रमाणे विरोधी वातावरण तयार करायचे. जास्ती संपत्ती आपल्याला मिळाली पाहिजे ही इच्छा उत्पन्न झाली. ही मनोवृत्ती म्हणजे लोभ विकार आहे. शुचिता गेली. त्यामुळे लोभ उत्पन्न झालेला आहे. लाभामुळे लोभ वाढत जातो. त्यामुळे अशांती कायम राहाते. दरिद्री मनुष्याच्या मनामध्ये जशी अशांती आहे तशी श्रीमंत मनुष्याच्या मनामध्येसुद्धा अशांती आहे. जास्ती कां मिळत नाही म्हणून अशांती. हा म्हणतो मला कांहीच नाही. मला दोन वेळच्या अन्न वस्त्रापुरते मिळाले तरी चालेल. पण त्याने अशांती आहे.

म्हणजे दरिद्री आणि श्रीमंत यांच्यामध्ये साम्य आले की नाही? काय फरक राहिला? मनामध्ये जर समाधान प्राप्त झालेलं असेल.


समाधान म्हणजे मोह निवृत्ती झाली. श्रीमंतालासुद्धा समाधानाशिवाय शांती नाहीये. कारण लोभामुळे जास्ती मिळाले पाहिजे असे वाटते. बाकीचे पुष्कळ दोष असतील त्यात. त्यागाकरता केल्या जाणाऱ्या अर्थ संग्रहाला भीतीचे कारण नाही. त्याला कांही चिंतेचे कारणच राहात नाही.

पंडितराज जगन्नाथांनी एका ठिकाणी वर्णन केले आहे. लोभी मनुष्य आपले द्रव्य राखून ठेवतो आणि उदार मनुष्य आपले द्रव्य देऊन टाकतो. पण दोघांची वृत्ती एक आहे. कार्य मात्र वेगळे आहे. ती कशी काय? लोभी मनुष्याला पैसा मिळायला लागल्यावर अन्न वस्त्राची काळजी राहिली नाही. पण जास्ती कां मिळत नाही ही चिंता उत्पन्न होते. त्यामुळे तो द्रव्यदान करु शकत नाही. सगळ्यांना द्रव्य दिले तर मी दरिद्री होईन. माझे जीवन कसे व्यवस्थित चालेल? हे लोभामुळे आहे. प्रत्येकाला आपल्याजवळ संपत्ती किती आहे, आपण दान किती करु शकतो हे माहिती असते. पैसे जरी असले तरी ते बँकेत असतात. ह्याला काय रोज इतके पैसे खर्चाला लागणार नाहीत. भोग जरी घ्यायचा ठरला तरी भोगाला सगळे पैसे कांही लागू शकत नाही. पुन्हा लागले, अमूक लागले, मनांतली एक शंका आहे, भीती आहे. तर तो लोभी मनुष्य कांहीही दान करु शकत नाही. मी दरिद्री होईन ना !

जो दानशूर महात्मा आहे, मोठं ज्याचं मन आहे, उदार आहे तो काय करतो. त्यालाही दारिद्राची शंका येते. मी पैसा ठेवला म्हणजे इन्कमटॅक्सची धाड येणार. चोरांची भीती आहे. त्यापेक्षा देऊन टाकलेला बरा. ठेवल्यामुळे मी दरिद्री होईन असे त्याला वाटते आणि









लोभी माणसाला वाटतं मी द्यायला लागलो तर दंरिद्री होईन. अशी दोघांची मनोवृत्ती वेगळी वेगळी आहे ना ! ही मनाची शुद्धी होणं म्हणजे रोग विकार नाहीसा होणं. सगळी साधनं लोभामुळे उत्पन्न होतात ना !

तर शुचिता काय आणि संतांचा आचार काय इकडं कुठं लक्ष जातयं? आज डोळ्यासमोर हे सर्व राज्य मिळवायचे आहे. त्यामुळे कपट मार्गाचा स्वीकार करुन त्याने ते राज्य हस्तगत झालेलं आहे. आता सगळं साम्राज्य मिळालेलं आहे. सगळी संपत्ती मिळालेली आहे. सैन्य सगळं ताब्यामध्ये आहे. पांडवांनाही वनवासात घालवून दिलेलं आहे. नुसतं घालवून नाही १२ वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. एक वर्ष अज्ञातवासाची अट घालताना अत्यंत बुध्दिचातुर्य त्याने दाखिवलेले आहे. अज्ञातवासात पांडव जर उघडकीला आले तर पुन्हा १२ वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. म्हणजे कपटाने कां होईना एकदा आपल्याला मिळालेले राज्य कायमचे आपल्याकडे राहिले पहिजे आणि पांडव कायमचे वनवासात राहिले पाहिजेत अशी योजना होती. साम्राज्य मिळूनसुध्दा पांडवांना त्रास देण्याची जी प्रकृती आहे ती प्रकृती बदलणं फार कठीण आहे. कितीही मोठा आदर्श समोर असो, सांगणारे पुढं असोत

*'प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहं किम् करिष्यसि ।'*

या श्लोकावर आणखी भाष्यकारांनी लिहिले आहे. मी जरी निग्रह करायचा म्हटला त्याच्या बुद्धीचा किंवा दुसऱ्याने कोणी तरी त्याच्या बुद्धीचा निग्रह होऊ शकणार नाही. अशी प्रकृती ज्यांची बनून गेलेली आहे त्यांचा शेवटी देवाला अवतार घेऊन नाशच करावा लागतो.

तर अशा रीतीनं हेही विकार त्यानी सांगितले.

***अर्थ संग्रह करणं हा दोष नाही. अर्थ संग्रह पाहिजे. व्यक्तीलाही पाहिजे. राष्ट्राला, समाजाला सर्वांना जरुर आहे. पण तो संग्रह झाल्यावर त्याचे वितरण कसं करायचं, दान कसं करायचं, त्याग कसा करायचा आणि आवश्यकता काय आहे, हे विकार उत्पन्न न होण्याकरताच त्याग सांगितला आहे. दानाचा उद्देश शास्त्र दृष्टीने असा आहे.***

आत्मस्वरुप जे आहे ते अत्यंत असंग आहे. असंग आत्मा आहे असं उपनिषदामध्ये सांगितले आहे. कशाचाही संबंध नाही. आता आम्ही यांत अशुद्धीमुळे सांपडलेलो आहोत. देहामध्ये आमचं मन गुंतून राहिलेलं आहे ही अशुद्धी आहे. ही अशुद्धी घालवण्याकरता किती प्रयत्न केला पाहिजे. ती गेल्याशिवाय आम्ही किंवा मोठे मोठेसुद्धा पुढे जाऊ शकत नाहीत.

चांगदेवाचे उदाहरण सांगतात. ते १४०० वर्ष जिवंत राहिले होते म्हणतात. शास्त्राप्रमाणे प्रयत्न करुन मृत्युसुध्दा परतविला होता. त्याच्या बरोबरच्या मेलेल्या मंडळींनाही ते जिवंत करीत असत, म्हणतात. इतकी शक्ती त्यांनी मिळिवली. परंतु त्यांच्या मनाची शुचिता अद्यापि वाढायची होती. शुचिता कमी होती. त्याच्यामध्ये दुसरा दोष उत्पन्न झालेला आहे. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी त्या काळात प्रसिद्ध झाली. सर्व लोकांत मान सन्मान त्यांना मिळाला. चांगदेवांना वाटलं आपल्यापेक्षा ह्यांची शक्ती मोठी आहे. ह्याचा आपण गुरू म्हणून स्वीकार करावा. म्हणून आणखी पत्र लिहायला बसले. ही कथा सगळ्यांना माहीत आहे. त्याचा थोडासा विचार करायचाय

आपल्याला. १४०० वर्षे जिवंत राहता आलं तरीसुद्धा शुचिता मिळाली नाही. अद्यापि कमी आहे. आणि पत्र लिहिताना प्रथमच त्याच्या मनांत संदेह निर्माण झाला. नमस्कार लिहायचा की आशीर्वाद? नमस्कार लिहायला काय हरकत होती? ज्ञानदेवांना आता गुरु करायचे होते ना ! त्याच्यापासून उपदेश ग्रहण करायचाय, मार्गदर्शन मिळवायचंय, मग त्यांना नमस्कार नको का करायला ? निरहंकार वृत्ती म्हणजे अहंकार पदार्थ आहे ना ! मी आपल्यापेक्षा कमी आहे. मला मार्गदर्शन आपल्याकडून मिळावं ही बुद्धी जी आहे, हा खरा, नमस्कार आहे. इतर नमस्कार हे दाखवण्याकरता असतात. पण नमस्कार म्हणजे ज्याच्यापासून मार्गदर्शन मिळवायचंय त्याच्यापेक्षा मी कमी आहे ही बुद्धी, निरहंकार वृत्ती आहे. तो अहंकार मनामध्ये आहे आणि अहंकार वाढायचे कारण म्हणजे १४०० वर्षांचा मी मोठा आहे. नमस्कार लहानांना कसा लिहायचा ?

मग लहानांना आशीर्वाद लिहायचा. पण तेही मनाला पटेना. ज्या ज्ञानेश्वरांचा आपण गुरु म्हणून स्वीकार करायचाच, त्यांना आशीर्वाद कसा लिहायचा ? कोराच कागद पाठिवला म्हणतात. चांगदेवांचे शिष्य तो कागद घेऊन निवृत्तीनाथांकडे आले. त्यांनी पाहून म्हटले, ''याच्यावर कांही लिहिलेले नाही'' त्या मुक्ताबाई स्पष्टवक्त्या होत्या. त्या म्हणाल्या, ''१४०० वर्ष जगून हा कोराच राहिला.''

ज्ञानेश्वर महाराजांना आणखी निवृत्तीनाथांची उत्तर लिहिण्याची आज्ञा झाली. मनामध्ये संदेह नाही कांही नाही. पूर्ण ज्ञान ज्याला झालेलं आहे असा ज्ञानी महात्मा. काया, वाचा, मनाची पूर्ण शुचिता ज्यांनी मिळीवलेली आहे. लगेच पहिली ओवी लिहिली गेली --

***स्वस्तिश्री वटेषु । जो लपोनु जगदाभासू ।***
***दावी मग ग्रासू । प्रगटिला जगी ।***

वटेश्वर चांगदेवांचे स्वस्ति असो म्हणजे कल्याण असो. केवढं व्यवहारचातुर्य आहे ! नमस्काराच्या द्वंद्वापासून दुसरी वाट काढली त्यांनी. नमस्कार आणि आशीर्वाद दोन्ही सोडून दिले. ज्यामुळे मी मोठा आहे मग नमस्कार कसा लिहायचा, चांगदेवांना वाटलं. त्यांना गुरु करायचंय मग आशीर्वाद कसा लिहायचा?

***'स्वस्तिश्री वटेषु'***

वटेश्वर चांगदेवांचे स्वस्ति म्हणजे कल्याण असो. मोठा समजत असला, मोठ्यांनी लहानांचे कल्याण लिहिता येते. लहान असला, लहानांनी मोठ्यांचे कल्याण चिंतन करता येतं. दोन्ही आहे. पवित्र अंत:करण आहे. आणि वटेश्वर चांगदेवांकडे आत्मस्वरुपाच्या दृष्टीने पाहताहेत. आत्मस्वरुप हे परमात्म स्वरुप आहे. संपूर्ण विश्व हे परमात्म स्वरुप आहे. हे ज्ञान म्हणजे पूर्ण शुचिता आहे. अशुचि कांही राहिली नाही. ईश्वरस्वरुप होऊन गेले. त्यामुळे आत्मस्वरुपाने ज्ञानेश्वर महाराज चांगदेवांकडे पहाताहेत. आत्म्याला कांही वय नाही कांही नाही. आत्मा अनादि, अनंत आहे. तेव्हां बाह्य शरीररुपाने त्यांनी चांगदेवांकडे पाहिले नाही. शरीरांतर्गत आत्मरुपाने त्यांनी पाहिले. तो आत्मा जर झांकला तर द्वंद्व दृष्टी उत्पन्न होते. तो आत्मा प्रगट झाल्यावर सबंध जगाचा आणखी विलय होऊन जातो. असा पहिल्या ओवीतच त्यांनी सिद्धांत सांगून दिला. म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांची दृष्टी, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक इतका पक्का आहे की क्षेत्राकडे कधीच दृष्टी नाही. चांगदेवांची दृष्टी अद्याप क्षेत्रामध्ये आहे. देहाच्या

पुढे त्यांची बुद्धी गेली नाही. १४०० वर्षांचा आहे. १४०० वर्ष वय कोणाला असतं? ज्या शरीराला कालाचा जास्त संबंध आला ते शरीर ज्येष्ठ असते. वडिल भाऊ आणि लहान भाऊ. वडिल याचा अर्थ कालाचा संबंध त्याच्या शरीराला जास्ती आहे. म्हणून त्याच्या ठिकाणी परत्व म्हणजे ज्येष्ठत्व आहे. ज्याच्या शरीराला कालाचा संबंध कमी असेल तो लहान आहे. शरीरामुळे लहान आणि मोठा हा विचार आहे. आत्मस्वरुपाला लहान आणि मोठा कोण? ते अनादि अनंत तत्त्व आहे. ही ज्ञानेश्वरमहाराजांची दृष्टी आहे. चांगदेवांची दृष्टी अद्यापि देहामध्येच आहे. क्षेत्राच्या पलीकडे बुद्धी गेलीच नाही. इतकी आणखी शक्ती मिळूनसुद्धा ! म्हणजे पूर्ण आत्मस्वरुप जे बनलेले आहेत त्यांनाच ही शुचिता प्राप्त होते. आणि ती शुचिता मिळाल्यानंतर त्यांचे बाह्य आचरणही अत्यंत शुद्ध असतं.

***ठेविले अनंते तैसेची राहावे ।***

***चित्ती असूं द्यावे समाधान ।***

हे जे तुकाराम महाराज सांगताहेत. ती जी परमात्म शक्ती आहे त्या शक्तीने सर्व कार्य चाललेलं आहे.

***'सकलमिदं अहं च वासुदेव: । वासुदेव: सर्वम् ।'***

हे ज्ञान अनेक जन्मांनी प्राप्त होते. सर्व विश्वाच्या ठिकाणी परमात्म बुद्धी, ज्ञानेश्वर महाराजांच्यासारखी, ही अनेक जन्मांच्या अभ्यासाने, शुचितेने, आचरणाने प्राप्त होते. त्यामुळे अर्थ शुचिता काय हे सर्व सहज त्यांच्या ठिकाणी पहायला मिळते. त्यांचे अर्थाकडे लक्ष जात नाही.

धर्मराजाची बुद्धी किती शुद्ध होती त्याची कथा महाभारतकारांनी

सांगितली आहे. वनांत एकदा त्यांना तहान लागली. जवळंच एक तळं होतं. भीम, अर्जुन वगैरेंना त्यांनी पाणी आणायला पाठवले. पण त्यांच्यापैकी कोणीच परत आले नाहीत म्हणून धर्मराज जाऊन पहातात तो चारही भाऊ त्या तळ्याच्या काठी मृत होऊन पडलेत. तिथे एक यक्ष बसला होता. त्याने धर्मराजांना सांगितले, ''तुझ्या भावांनी माझे ऐकले नाही म्हणून ते मरुन पडलेत. तूं जर ऐकले नाहीस तर तुझीही अशीच अवस्था होईल. माझ्या प्रश्नांची उत्तरे दे.''

परमात्मा 'लोकमहेश्वर' कसा आहे हे दाखवण्याकरता गुण वर्णन केले आहे. हे सगळे गुण त्याच्यापासून मिळतात. त्यापैकी ''असंमोह'' नांवाचा जो गुण आहे. कोणचेही कर्तव्य कर्म करताना बुद्धीमध्ये मोह नाही, चिंता नाही, भीती नाही. निर्विकार मन राहाणं हा 'असंमोह' पदार्थ आहे. चारही भाऊ मरुन पडलेले आहेत. काय वाटलं असेल धर्मराजाला? माझ्याकरता वनांत आलेले माझ्यावर प्रेम करणारे चारही भाऊ गेले. पुढे वनवास संपल्यावर राज्य मिळवायच्या वेळेस त्यांची मदत झाली असती. पुढचेही नाही. आत्ताही नाही.

सर्वही प्रश्नांची उत्तरे धंर्मराजांनी दिली. यक्ष संतुष्ट झाले. ते म्हणाले, ''धर्मराज, माझ्या मनाचे समाधान झालेले आहे. या चार भावांपैकी कोणता तरी एक भाऊ मी जिवंत करतो. कोणाला जिवंत करु सांग.'' काय सांगावं ह्यांनी? धर्मराज म्हणाले, ''या नकुलाला आपण जिवंत करा'' यक्षराज हंसले. ''काय, हा लहान मुलगा? हा जिवंत होऊन तुला काय सहाय्य करणार? तुला राज्य मिळवायचे आहे ना वनवास संपल्यावर? अर्जुन, भीम यांच्यापैकी कोणाला

सांग. नकुल जिवंत व्हावा असें कां मागतो आहेस?''

सत्यपालन करण्याची निष्ठा धर्मराजांच्या अंत:करणात आहे. त्यामुळे धर्मराजांनी सांगितले, ''यक्षराज, ह्यात माझा उद्देश निराळा आहे. मला दोन माता होत्या. एक माता सहगमन करुन गेली. ती माता जी माद्री तिचा हा मुलगा जर जिवंत झाला तर तिच्याही मनाला समाधान वाटेल. या करता नकुलाला जिवंत करा अशी माझी प्रार्थना आहे.'' केवढी आणखी मनाची पवित्र स्थिती आहे ! असंमोह कसा विलक्षण आहे ! ईश्वराची केवढी कृपा आहे ! चारही भावांना त्या यक्षाने जिवंत केले आहे. एकाला जिवंत करायचे सामर्थ्य ज्याच्याकडे आहे त्याला चार भावांना जिवंत करता येणार नाही काय? पण ह्याची बुद्धी कशी आहे ! ह्याच्या धर्मशील बुद्धीमुळे आणखी उत्तम व्यवहार होतो आहे. परमार्थ तर होतोच आहे. आपले बंधू जिवंत झाले नाहीत तर आपण काय करायचं इकडे त्याने आपली बुद्धी जाऊ दिली नाही. नकुलाला जिवंत करा पुढचं पहाता येईल, म्हणाला. राज्य मिळवण्याकडे लक्ष दिले नाही त्याने. हे त्यांनी आणखी मुद्दाम दाखवून दिले आहे.

स्वामींचा आणखी निरोप आलेला आहे. कोंडाणा किल्ला मिळाला पाहिजे. तानाजीच्या मुलाचे लग्न ठरलेले आहे. बोलावणे करण्याकरता निघालेले असताना आणखी दूत आलेला आहे. लग्न राहू दे. अगोदर स्वामींची आज्ञा पालन करायची आहे. निघालेले आहेत. ते काय कुठं ट्रिपला जायचं नव्हतं युद्ध म्हणजे. पण ते पत्करलं पाहिजे. गेले युद्धावर. प्राणार्पणही झालेलं आहे. गड मिळालेला आहे. सिंहगड म्हणून नांव ठेवलेले आहे. शिवाजीमहाराजांनाही दु:ख झालं.

ही मनोवृत्ती उत्पन्न झालेली आहे. अर्थार्जनाकडे लक्ष असावं,

नाही असं नाही. अर्थार्जन केल्यावर लगेच त्यागाकडे प्रवृत्ती झाली पाहिजे. तर तो अर्थ शुद्ध होऊन जातो किंवा संसाराकडे लक्षसुद्धा नाहीये. अशा प्रकारचे लोकोत्तर गुणसंपन्न महात्मे त्यांनासुद्धा भगवंतांनी विभूती म्हटलेले आहे. माझा विशेष आविर्भाव तिथे झालेला आहे असे समजायला हरकत नाही. इतकी स्वामीभक्ती या राष्ट्रात होती. अशी स्वामीभक्ती जर उत्पन्न झाली, केवळ अर्थार्जनाकडे आपली बुद्धी जाईनाशी झाली. *''भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे''* हा उपदेश ज्ञानेश्वर महाराजांनी राष्ट्राकरताच केलेला आहे. संतांनी राष्ट्राकरता कांही केलं नाही वगैरे पुष्कळ आरोप करतात मोठे मोठे बुद्धिवादी लोक. बुद्धिवादातसुद्धा फरक आहे. संतांचा, महात्म्यांचा बुद्धिवाद वेगळा आहे. धर्मराजांचे उदाहरण हा महात्म्यांचा बुद्धिवाद आहे. आणि सर्व सामान्य जे लोक आहेत त्यांचा बुद्धिवाद वेगळा आहे.

शास्त्रकारांनीसुद्धा ''बुद्धी कर्मानुसारिणी'' हा एक सर्व सामान्य सिद्धांत सांगून दिलेला आहे. जसं पूर्वीचे कर्म झालेले असेल त्याप्रमाणे बुद्धी आपल्याबरोबर या जन्मामध्ये येते. हा एक सामान्य बुद्धिवाद आहे. परंतु

***'ददामि बुद्धि योगंतं येन माम् उपयांति ते ।'***

हे भगवान सांगताहेत. मी बुद्धी त्याला देतो, म्हणाले. माझ्यापर्यंत येऊन पोहोचतील. शास्त्राप्रमाणे शुचिता वगैरे सर्व पालन झालं तर हा बुद्धियोग त्याला मिळतो. त्याला लागणारी बुद्धी मी देतो. धर्मराजाप्रमाणे बुद्धी जर मिळाली म्हणून शास्त्राने, देवाने दोन प्रकारचे बुद्धिवाद सांगितले आहेत -- ईश्वरदत्त बुद्धी ज्यांना मिळाली आहे तो बुद्धिवाद वेगळा आहे आणि सामान्य बुद्धिवाद हा कर्माप्रमाणे

आहे. चांगलही असेल वाईटही असेल, संमिश्रही असेल. तो कांही सांगता येणार नाही. म्हणून असे दोन प्रकारचे बुद्धिवाद आहेत.

तुकाराम महाराजांच्या घरामध्ये नेसायला कांही नाही, बायको मुलांना खायला कांही नाही तरी ह्यांनी शिवाजीमहाराजांनी पाठवलेला नजराणा परत पाठवला.

***न मिळो खावया न वाढो संतान ।***
***परि हा नारायण कृपा करो ।***

हा बुद्धिवाद कोणचा म्हणायचा?

***विटंबो शरीर होत का विपत्ती ।***
***परि राहो चित्ती नारायण ।***

सर्व लोकांची जी अपेक्षा आहे तशी एकही अपेक्षा यांची नाही. तुकाराम महाराजांच्या बुद्धीवरती काय परिणाम झाला की काय? वेडे आहेत तुकाराम महाराज, असे आमच्यासारखे आधुनिक बुद्धिवादी म्हणणार. पण शेवटी त्यांनी जे सांगितलंय ते ऐकून सर्व बुद्धिवाद्यांना गप्प बसावे लागणार --

***तुका म्हणे नाशवंत हे सकळ ।***

अविनाशी परमात्म्याची प्राप्ती झाली पाहिजे. हा जो त्यांनी शेवटी विचार मांडलेला आहे त्यामुळे बाकीचे सर्व आक्षेप निघून जातात. तर्कशुद्ध मांडणी आहे. ज्ञानपूर्वक त्यांची श्रद्धा आहे. त्यांची भक्ती अत्यंत श्रेष्ठ भक्ती आहे. पूर्ण ज्ञान आहे.

***ज्ञात्वा भूतादि---***
***महात्मास्तु***
***भजंति अनन्य मनस:***

भगवान सांगताहेत. 'अनन्य मनस:' होतात आणि मी कसा आहे हे जाणून भक्ती करतात. सर्व भूतांचा आदि मी आहे. पंचमहाभूतांपासून सगळी सृष्टी झाली आहे. त्या पंचमहाभूतांनाही ज्याने निर्माण केलेले आहे तो परमात्मा आहे म्हणून त्याच्याकडे त्यांचे अंत:करण हे जाणून जातंय. ज्ञानपूर्वक त्यांची भक्ती आहे. अशी श्रद्धा अज्ञानाने नाहीये.

तर अशा प्रकारचे महात्मे ज्यांनी आपल्या मनामध्ये पूर्ण शुचिता -- आचरणामध्ये शुचिता आहे त्याचप्रमाणे मनामध्ये तर पूर्ण आहेच, अशी मिळीवलेली आहे, ती शुचिता किंवा तशा प्रकारचे धर्माचरण वगैरे करुन आपली उन्नती करुन घ्यावी असं शास्त्रकार किंवा महात्म्यांचे सांगणे आहे. धर्म परिवर्तनीय आहे असा आधुनिक बुद्धिवाद आहे, हरकत नाही. धर्म परिवर्तनीय आहे पण कसा? चातुर्वर्णाश्रम त्याकरता आहे. ब्रह्मचर्याश्रमांत त्या धर्माचे आचरण करायचे. त्याचे जे मुख्य प्रयोजन आहे त्याप्रमाणे सद्गुरुंची सेवा वगैरे करायची आणि त्यातून पुढे इच्छा असेल तर गृहस्थाश्रम करायचा. तो सोडायचा धर्म. हे परिवर्तन झालं की नाही ! इच्छा होईल तेव्हां या पक्षात जायचं, इच्छा होईल तेव्हां त्या पक्षात जायचं हे परिवर्तन नाही मात्र. हा परिवर्तनवाद नाही. एका धर्माचे आश्रमामध्ये पूर्ण धर्माचरण करुन दुसऱ्या आश्रमात जायचे. गृहस्थाश्रमही सोडता येतो. शास्त्रकारांनीच सांगितलंय ना ! ब्रह्मचर्याश्रम ज्ञानाकरता आहे. सद्गुरुंच्या जवळ राहून सर्वही प्रकारचं दृढ ज्ञान मिळवायचे. ज्ञान हे पक्कं झालं पाहिजे. पक्कं होण्याकरता गृहस्थाश्रम आहे.

पुण्यातल्या एका वकिलांची गोष्ट सांगतात. त्यांचे नांव सांगायचे कांही कारण नाही. प्रसिद्ध आहेत. त्यांनी ज्ञान उत्तम मिळीवलेले होते पण त्यांना कांही व्यथा होत्या. एकदा त्यांनी एका अशिलाचा दावा घेतला होता. आणि आर्ग्युमेंट करायच्या दिवशी ते जाऊन बोलायला उभे राहिले. त्यावेळी त्यांची कांही बुद्धी ठिकाणावर नव्हती. जो विरुद्ध पक्षाचा होता त्याच्याच पक्षाचे बोलायला सुरवात केली. त्याला बरच झालं. त्याचे वकिल आपल्याच पक्षाचे समर्थन करताहेत. १५ मिनिटे झाली. वीस मिनिटे झाली. त्यांच्या कारकुनाने एक चिठ्ठी लिहून त्यांच्यासमोर ठेवली. मग त्यांची बुद्धी ठिकाणावर आली आणि मग त्यांनी विरोधी पक्षाच्या विरोधात बोलायला सुरवात करुन केस जिंकली. म्हणजे कायद्याचे दृढ ज्ञान त्यांनी मिळीवलेलं होतं.

तसा ब्रह्मचर्याश्रम हा उत्तम ज्ञान मिळिवण्याकरता आहे. आचार्य सेवा करण्याकरता आहे. बुद्धी उत्तम, शुद्ध करण्याकरता आहे. ज्ञान मिळवण्याकरता आहे. धर्म परिवर्तन करता येतं. शास्त्राज्ञेप्रमाणे त्याची जर इच्छा असेल तर तो गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश करु शकतो. हा परिवर्तनवाद आहे. त्या त्या आश्रमामध्ये राहून संपूर्ण धर्माचरण करुन नंतर त्याचं फल प्राप्त करुन घेऊन पुढच्या आश्रमाला योग्य अशा प्रकारची आपली उन्नती प्राप्त करुन घेऊन पुढचे आश्रम स्वीकारायचे. हा परिवर्तनवाद करा की तुम्ही. ते न करता हे धरा ते सोडा, काय उपयोग काय याचा?

तर अशा रीतीने सर्व आश्रमांचे आचारधर्म शास्त्रकारांनी सांगितलेले आहेत. आणि हे फक्त शुचिता म्हणजे शुद्धीकरता सांगितले आहेत. अर्थशुद्धी ही फक्त साधनशुद्धी आहे. धन हे साधन

आहे. पण सध्या धन हे साध्य झालेले आहे. साध्य झाल्यानंतर ते मिळवण्याकरता काय वाटेल ते केलं तरी चालतं अशी बुद्धी उत्पन्न होती. आणि मग त्याच्यामध्ये सारासार विचार, विवेक नाहीसा होतो. तसे होऊ नये म्हणून शास्त्रकारांनी शास्त्राचे आणि शुचितेचे उत्तम ज्ञान करुन घ्यायला सांगितले आहे. ते पावित्र्य, मनाचं, शरीराचं, इंद्रियांचे, आचरणाचे, हे जितकं वाढिवता येईल तितकं वाढिवलं पाहिजे. त्याकरता ईश्वराची उपासना संतांनी मुद्दाम सांगून दिलेली आहे. ती भगवंताची उपासना करुन त्याच्या कृपेने मध्ये येणारे सर्वही प्रतिबंध दूर होतात. आणि आपला सत् प्रयत्न जो आहे तो यशस्वी होतो. अशा रीतीने हे शास्त्रकारांचे सांगणे आहे.

यAप्रमाणे यथामती थोडेसे विवेचन या ठिकाणी केले.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

सोलापूर.

**॥ श्री गुरु: शरणम् ॥**

*धर्मे प्रितिम् सन्मतिम् देवभक्तिम्*
*सत्संगाप्तिम् देहि भुक्तिंम् च मुक्तिम् ।*
*भावासक्तिम् चाखिलानंदमूर्ते*
*घोरात् कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥*

ईश्वराजवळ काय मागावं हे श्लोकात महाराजांनी सुचविलं आहे, आणि ईश्वरच ते देऊ शकतो. यांत ''धर्मे प्रितिम्'' ही पहिली मागणी त्यांनी मागितली आहे. धर्माबद्‌दल प्रेम असावे. आपला जो काही आचार विचार आहे तो प्रेमाने आपण केला पाहिजे. लोकांना दाखविण्याकरतां किंवा लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून करायचं नाही. धर्मराज धर्माचा आदर्श म्हणून प्रसिद्ध होते. धर्माचरणाचे फळ मिळो अथवा न मिळो, पण जसं ईश्वरानं सांगितले आहे त्याप्रमाणे वागायचं. बारा वर्षे वनांत व एक वर्षे अज्ञातवासात रहायचं कबूल केलं त्यांनी. पराजय झाला होता त्यांचा. त्याप्रमाणे वनांत रहायला गेले म्हणजे सत्य आपण जे कबूल केले आहे ते शेवट पर्यंत पाळले पाहिजे. असे धर्माबद्दल अत्यंत प्रेम मनांत ठेवून धर्माचरण केले म्हणून ईश्वराची कृपा त्यांच्यावर झाली. श्रीकृष्णांनीसुद्धा पांडवांचा पक्ष घेण्याचे कारण हेच आहे. पांडव हे धर्मशील होते.

धर्मराजांची एक गोष्ट महाभारतात दिलेली आहे. धर्मराजांना तहान लागली म्हणून भीम पाणी आणायला गेला. मोठा तलाव होता त्याला पण तहान लागली. आणि तो पाणी पिणार इतक्यात समोर एक मोठा धिप्पाड पुरुष आला. तो म्हणाला, ''हा तलाव माझा

आहे. प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि पाणी पी.'' भीमाने ऐकले नाही त्याचे. तो पाणी पिताच गतप्राण होऊन गेला. त्यानंतर अर्जुन, नकुल, सहदेवांचीही तिच अवस्था झाली. नंतर धर्मराजांनी आल्यावर जेव्हा आपली चारही भावंडे मरुन पडल्याचे पाहिल्यावर त्यांना वाईट वाटले. यक्ष पुरुषाने काय झाले ते सांगून त्यालाही तेच प्रश्न विचारले. चारही बंधू मरुन पडले असतानाही धर्मराजांनी मन शांत ठेवून सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. यक्षप्रश्न म्हणून एक प्रकरणंच महाभारतात आहे. यक्ष म्हणजे साक्षात यमदेवच होते. उत्तरे ऐकून समाधान झाल्यावर ते म्हणाले, ''माझ्या सर्व प्रश्नांची तू बरोबर उत्तरे दिलीस, म्हणून मी प्रसन्न झालो आहे. आता या चौघांपैकी कोणत्या तरी एका भावाला मी जिवंत करीन. कोणाला करु?''

धर्मराजांनी नकुलाला जिवंत करायला सांगितले. यमराज म्हणाले, ''नकुलाचा काय उपयोग होणार तुला? लहान मुलगा आहे तो ! भीम किंवा अर्जुन जिवंत झाला तर तुझ्या उपयोगी पडेल. तुला पुढे राज्य मिळवायचे आहे, तर नकुलाला जिवंत करा असे का म्हणतोस?''

धर्मराज म्हणाले, ''मला कुंती आणि माद्री अशा दोन माता आहेत. कुंतीचा मी मुलगा जिवंत आहे. त्याप्रमाणे माद्रीचा मुलगा नकुल जिवंत झाला तर तिला समाधान मिळेल, म्हणून त्याला जिवंत करा.''

धर्माने वागायचा हा नियम. कोणत्या भावाचा उपयोग होईल आणि कोणत्या भावाचा नाही हा व्यवहारिक विचार धर्मराजांनी न केल्याने यमदेव प्रसन्न झाले आणि त्यांनी चौघांनाही जिवंत केले.

अशी मोठी धर्मनिष्ठा ! धर्माबद्दल अत्यंत प्रेम ! म्हणून महाराजांनी देवाजवळ हे पहिले मागणे मागितले आहे.

त्याच्यानंतर 'सन्मतिम्।' उत्तम बुद्धी पाहिजे. भीम, अर्जुन इत्यादी भावंडांना कौरवांनी दिलेला त्रास पसंत नव्हता. कौरवांबरोबर युद्ध करुन आपण राज्य घेऊ असे ते म्हणत . धर्मराज वावगे काही वागत नसत. ही धर्मबुद्धीही त्यांना ईश्वराच्या कृपेनेच मिळाली होती. बाकीचे पांडव म्हणत काय तुमच्या धर्माचरणाचा उपयोग? अधर्माने वागणारे कौरव राजे झाले. तुम्ही धर्माने वागून राज्य घालविले. तुम्हाला वनवास मिळाला. पण शेवटी धर्मराजांच्या धर्मबुद्धीचा सर्वांवर परिणाम झाला व ते धर्मराजांच्या इच्छेला मान देऊ लागले.

''सन्मतिम्'' हे मागणे देवाजवळ मागितले आहे. आपण प्रयत्न करुन तशी सन्मती होईलच असे नाही. ईश्वर कृपेनेच शुद्ध न्यायाने जाण्याची बुद्धी मिळते.

तिसरे म्हणजे ''देवभक्तिम्'' ईश्वराची भक्तीही ईश्वराजवळच मागितली आहे. आपल्या प्रयत्नांनी आपण भक्ती, प्रेम करु म्हटलं तर होत नाही, आणि झालंच तर त्याला व्यापारी स्वरुप येतं. रावणाने, हिरण्यकश्यपूने तप:श्चर्या केली. देव प्रसन्न झाले. वर दिला. परंतू देवाबद्दल भक्ती, प्रेम नसल्याने आपले काम झाल्यावर त्यांनी तप:श्चर्या वगैरे सर्व सोडून दिले. आपल्या तप:श्चर्येचं फळ देवानं दिले. स्वत:चे असे काही दिले नाही, अशी त्यांची बुद्धी होती. ही खरी भक्ती नाही. म्हणून ईश्वराजवळच त्याची भक्ती मागावी लागते. तरच उत्तम बुद्धी, प्रेम आणि भक्ती मिळते.

चौथी मागणी आहे ''सत्संगाप्तिम्'' संतांची संगती घडावी.

ज्यांच्याजवळ सद्बुद्धि आहे, धर्माचरण आहे, जे देवाची खरी भक्ती करतात त्यांची संगती धरली की, आपोआप दैवी कृपा मिळते. ईश्वराच्या कृपेने सत्पुरुषांची संगती घडून येते. मार्गदर्शन होते आणि त्याप्रमाणे वागण्याची बुद्धी होते. म्हणून आम्हाला नेहमी सत्संग घडावा हे मागणं मागितलं आहे.

आणि शेवटी ''देही भुक्तिंच मुक्तिम्।'' भुक्ती म्हणजे संसार. संसारही मागा म्हणाले. हरकत नाही पण देवाजवळ मागा. मुक्ती तर हवीच आहे. सर्व दु:खांची निवृत्ती हाच मोक्ष आहे. हा मोक्ष मागायचा. परंतु त्यापूर्वी आपलं मन जे विषयभोगांकडे जात असतं त्यासाठी विषयभोगही मागायला हरकत नाही. पण देवाजवळ मागा. अढळपद मिळवण्यासाठी ध्रुवाने उग्र तप:श्चर्या करुन ते पद प्राप्त करुन घेतले आणि देवाच्याच कृपेने त्यातून तो सुटला आहे.

आधी जरी संसारातील वासना उत्पन्न झाली आणि त्यासाठी देवाकडे मागणी केली तर त्याच्या कृपेने ती पूणे होते. हळूहळू वासना कमी होतात. ही सुद्धा ईश्वराचीच कृपा व्हावी म्हणून महाराजांनी मुद्दाम या स्तोत्रामध्ये भुक्ति हेही मागणे देवाजवळ मागून घेण्यास हरकत नाही, असे सांगितले आहे.

आणि मुक्ति तर घ्यायचीच आहे मागून. ती ईश्वराशिवाय दुसरे कोणीही देऊ शकत नाही. सर्वही दु:ख कायमची जाणं याला मोक्ष म्हणतात. आमची व्याधीरुपी दु:खे औषधाने जरी बरी झाली, तरी ती पुन्हा कधीही होणार नाहीत असे सांगता येत नाही. ***पुढे केव्हाही दु:ख उत्पन्न न होणे याचं नांव मुक्ती.*** आणि केव्हाही दु:ख उत्पन्न होणार नाही असे हवे असेल, तर जन्म कायमचा बंद झाला पाहिजे,

देहाचा संबंध सुटला पाहिजे. देह म्हटला की, दु:ख आलीच. बरं देहाचा संबंध सुटायचा म्हणजे कर्म संपली पाहिजेत. आपल्या कर्माचं फळ म्हणून देहाचा संबंध म्हणजे जन्म येतो. याकरता सर्व पाप-पुण्य कर्माचा ईश्वरकृपेने क्षय झाला म्हणजे जन्म मृत्यु व दु:ख कायमची संपली. ही अवस्था अनेक जन्मांनंतर मिळते. अनेक जन्म साधना करुन, ईश्वराची कृपा संपादन करायची आणि ईश्वराचे दर्शन, आत्मज्ञान झाले की, सर्व कर्मांचा क्षय होतो. पण तेही देवानेच द्यावयाचे आहे.

आणि सर्वात शेवटी''भावासक्तीम्'' मागणं मागितलं आहे. भाव म्हणजे प्रेम. ते अधिकाधिक वाटत जावे हीही प्रार्थना केली आहे. पण ''भावासक्तीम्'' म्हणून स्वतंत्र मागणं मागितले त्यांनी. श्रीगुरुचरित्रातल्या चाळीसाव्या अध्यायात जी कथा सांगितली आहे, त्यात आपल्याला भावासक्तींचे दर्शन घडतं. ही भावासक्तीसुद्धा त्याच्याच कृपेने मिळते. म्हणून या सातही गोष्टी ईश्वराने आपल्याला दान कराव्यात म्हणून ही प्रार्थना (स्तोत्र) केली आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

# - नोंद -

# - नोंद -

# - नोंद -